भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# भारतीय गोदी कामगार अधिनियम, १९३४

(१९३४ चा अधिनियम क्रमांक १९)

[ १ ऑक्टोबर, १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे ]

# The Indian Dock Labourers Act, 1934

(Act No. 19 of 1934)

[ As in force on 1st October, 1977 ]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

१९७८

[ किंमत—४० पैसे ]

144/R

## भारतीय गोदी कामगार अधिनियम, १९३४

### कलमांचा क्रम

कलमे


१. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ व प्रयुक्ती.

२. व्याख्या.

३. निरीक्षक.

४. निरीक्षकांच्या शक्ती.

५. गव्हर्नर-जनरल-इन-कौन्सिलची विनियम करण्याची शक्ती.

६. स्थानिक शासनाची नियम करण्याची शक्ती.

७. विनियम आणि नियम यांच्याशी संबंधित असलेले सर्वसाधारण उपबंध.

८. अधिनियम आणि विनियम ठळक ठिकाणी लावणे.

९. दंड.

१०. अधिकारितेसंबंधी उपबंध.

११. सूट देण्याची शक्ती.

१२. या अधिनियमाखाली कृती करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण.

# भारतीय गोदी कामगार अधिनियम, १९३४
## (१९३४ चा अधिनियम १९)[1]

[ १९ ऑगस्ट, १९३४ ]

जहाजावर माल चढवण्याच्या आणि उतरवण्याच्या कामावर ठेवण्यात आलेल्या कामगारांचे अपघातांपासून संरक्षण करण्यासंबंधीचा अभिसंधी [2]* * * * परिणामक करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, जहाजावर माल चढवण्याच्या किंवा उतरवण्याच्या कामावर ठेवण्यात आलेल्या कामगारांचे अपघातांपासून संरक्षण करण्यासंबंधीचा सुधारित प्रारूप अभिसंधी जिनेव्हा येथे सत्तावीस एप्रिल एकोणीसशे बत्तीस रोजी अंगीकारण्यात आला ;

आणि ज्याअर्थी, [2]* * * * उक्त अभिसंधीची अंमलबजावणी करणे समयोचित आहे ;

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ व प्रयुक्ती.

१. (१) या अधिनियमास 'भारतीय गोदी कामगार अधिनियम, १९३४' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार [3]* * * * संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारा नियत करील अशा [4]दिनांकाला तो अंमलात येईल.

(४) कोणत्याही राष्ट्राच्या कोणत्याही लढाऊ जहाजाला तो लागू होणार नाही.

व्याख्या.

२. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,—

(क) "प्रक्रिया" यामध्ये, जहाजी माल किंवा इंधन जहाजावर चढवणे किंवा त्यातून उतरवणे यासाठी आवश्यक असलेले किंवा आनुषंगिक असलेले आणि जे जहाजाच्या बोडदावर किंवा त्याच्या बाजूने केले जाते अशा सर्व प्रकारच्या कामांचा समावेश आहे ; आणि

(ख) "कामगार" याचा अर्थ, या प्रक्रियांमध्ये कामाला असलेली कोणीही व्यक्ती असा आहे.

निरीक्षक.

३. (१) [5][केंद्र शासनाला] **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारा, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, त्यास निरीक्षक म्हणून योग्य वाटतील अशा व्यक्तींची, त्या त्या व्यक्तींना ते नेमून देईल अशा स्थानिक सीमांमध्ये नियुक्ती करता येईल.

(२) या अधिनियमाखाली वाणिज्य नौधन विभागातील सर्व प्रधान अधिकारी, त्यांच्या त्यांच्या कार्यभाराच्या क्षेत्रात पदसिद्ध निरीक्षक असतील.

(३) प्रत्येक निरीक्षक हा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल आणि [6][केंद्र शासन] निदेशित करील अशा प्राधिकरणास तो पदतः दुय्यम राहील.

निरीक्षकांच्या शक्ती.

४. कलम ६ खाली याबाबत केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, निरीक्षकाची ज्या स्थानिक सीमांपुरती नियुक्ती करण्यात आली आहे त्या सीमांमध्ये त्याला—

(क) जेथे प्रक्रिया चालवल्या जातात अशा कोणत्याही वास्तूमध्ये किंवा जहाजावर स्वतःला योग्य वाटतील अशा मदतनीसांसह (असल्यास) प्रवेश करता येईल ;

(ख) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी त्याला आवश्यक वाटेल अशी, प्रक्रियेसाठी वापरलेली वास्तू किंवा जहाज आणि कायम बसवलेली किंवा सुटी यंत्रसामग्री व सरंजाम यांची आणि कोणत्याही विहित नोंदवह्या आणि नोटिसा यांची तपासणी करता येईल व त्याला आवश्यक वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीची जागच्या जागी किंवा अन्यथा साक्ष घेता येईल; आणि

---

[1] हा अधिनियम—
(एक) पाँडिचेरीमध्ये १९६३ चा विनियम ७, कलम ३ आणि पहिली अनुसूची यांद्वारे,
(दोन) गोवा, दमण आणि दीवमध्ये अधिसूचना क्रमांक जीएसआर. १८४९, दिनांक ३० डिसेंबर, १९६४ द्वारे (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून—पहा, अधिसूचना क्रमांक जीएसआर. ५५०, दिनांक १ फेब्रुवारी, १९६५) अंमलात आला.

[2] "भारताच्या प्रांतांमधील" हे शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे गाळण्यात आले.

[3] "भाग ख राज्यांखेरीज" हे शब्द भाग ख राज्ये (विधि) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ३) द्वारे गाळण्यात आले.

[4] १० फेब्रुवारी १९४८—पहा **गॅझेट ऑफ इंडिया,** १९४८, भाग एक, पृष्ठ ८८.

[5] भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७ द्वारे "स्थानिक शासन" याऐवजी घालण्यात आले.

[6] भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७ द्वारे "स्थानिक शासन" या शब्दाऐवजी घालण्यात आले.

(ग) कलम ५ खाली केलेल्या विनियमांद्वारे त्याला प्रदान करण्यात येतील अशा अन्य कोणत्याही शक्तींचा वापर करता येईल.

गव्हर्नर-जनरल-इन कौन्सिलची विनियम करण्याची शक्ती.

५. (१) केंद्र शासनाला पुढील प्रकारचे विनियम करता येतील :—

(क) किनाऱ्यावरील कामाच्या जागा, तसेच जेथे प्रक्रिया चालते त्या कामाच्या ठिकाणी ये-जा करण्यासाठी कामगार ज्यांचा वापर करतात असे गोदी, मालधक्का, मालकट्टा किंवा तत्सम वास्तू यांच्यावरील कोणतेही नित्याचे पोचमार्ग यांची सुरक्षितता, आणि अशा ठिकाणी व पोचमार्गांवर प्रकाशयोजना करणे व कुंपणे बांधणे यांबाबत उपबंध करणारे ;

(ख) मालकट्टा, गलबताचा सांगाडा किंवा अन्य जलयान यांच्या बाजूला लागून असलेल्या जहाजापर्यंत ये-जा करणाऱ्या कामगारांच्या वापरासाठी पुरवल्या जाणाऱ्या प्रवेशसाधनांचे स्वरूप विहित करणारे ;

(ग) पाण्यातून जहाजापर्यंत ये-जा करणाऱ्या कामगारांची वाहतूक सुरक्षित होण्याची निश्चिती करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना आणि त्या प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या जलयानांनी अनुपालन करावयाच्या शर्ती विहित करणारे ;

(घ) कामगारांनी जहाजाच्या मजल्यावरून, जेथे प्रक्रिया चालू असतील अशा कोठीकडे जाण्यासाठी वापरण्याकरिता पुरवण्यात येणाऱ्या प्रवेशसाधनांचे स्वरूप विहित करणारे ;

(ङ) कामगारांना धोकादायक ठरण्याची शक्यता आहे असे त्यांना प्रवेश करता येण्यासारखे असलेले फाळके व जहाजाच्या मजल्यावरील इतर उघडण्या सुरक्षित ठेवण्यासाठी करावयाच्या उपाययोजना विहित करणारे ;

(च) ज्या जहाजावर प्रक्रिया चालू असतील तेथे प्रवेश करण्यासाठी असलेली साधने आणि बोडदावर ज्या ठिकाणी कामगारांना कामाला लावले असेल किंवा जेथे त्यांना जावे लागेल अशा ठिकाणी कार्यक्षम प्रकाशयोजना करण्याबाबत उपबंध करणारे ;

(छ) फाळका-आच्छादने आणि फाळके आच्छादित करण्यासाठी वापरलेल्या तुळया काढण्याच्या किंवा त्या जागी नवीन घालण्याच्या कामी लावलेल्या कामगारांच्या सुरक्षिततेबाबत उपबंध करणारे ;

(ज) कोणतेही उच्चलन यंत्र किंवा त्याच्या संबंधात वापरलेला कोणताही सरंजाम—मग तो कायम बसवलेला असो वा सुटा असो—बिनधोक व दुरुस्त स्थितीत असल्याशिवाय किनाऱ्यावर किंवा जहाजाच्या बोडदावर चालणाऱ्या प्रक्रियांमध्ये वापरला जाणार नाही हे सुनिश्चित करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना विहित करणारे ;

(झ) यंत्रसामग्री, सचेतन विद्युतवाही आणि बाष्प नळ यांसाठी कुंपणे बांधण्याबाबत उपबंध करणारे ;

(ञ) गदम, याऱ्या, कर्षी यांवरील सुरक्षा उपकरणांची तरतूद करण्याबाबत विनियमन करणारे ;

(ट) निष्कासित व सचेतन वाफेच्या बाबतीत कोणती खबरदारी घ्यावी हे विहित करणारे ;

(ठ) प्रक्रियेमध्ये वापरण्यात येणाऱ्या यंत्रसामग्रीचे उद्वहन किंवा परिवहन करणारी यंत्रे चालवणे किंवा अशा यंत्रसामग्रीच्या चालकाला संकेत दर्शविणे किंवा कर्षीच्या टोकावर किंवा कर्षी-रंभावर पडणाऱ्या जहाजी मालाकडे लक्ष पुरवणे या कामी कार्यक्षम आणि भरवशाच्या व्यक्ती नेमणे आवश्यक करणारे, आणि कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असेल तेथे संकेतकाची नेमणूक करण्यासंबंधी उपबंध करणारे ;

(ड) जहाजी मालाची रास रचणे किंवा त्या राशीतून माल काढणे, तसेच तो ठासून भरणे किंवा त्यातून माल काढणे किंवा त्यासंबंधात हाताळणी करणे या बाबतीतील धोकादायक कार्यपद्धतींना आळा घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजना विहित करणारे ;

(ढ) कोठीमध्ये किंवा दोन मजल्यांच्या दरम्यान कोळसा किंवा अन्य भरताडी मालाची हाताळणी करण्याच्या कामासाठी कामगारांची नेमणूक करण्यात येईल तेव्हा त्यांना संकटकाली सुटका करून घेणे सुकर व्हावे यासाठी कोणती खबरदारी घ्यावयाची हे विहित करणारे ;

(ण) माचणी आणि लाडीस यांचा उपयोग करताना कोणती खबरदारी घ्यावयाची हे विहित करणारे ;

(त) जेथे घातक किंवा अपायकारक माल असेल किंवा ठासून भरलेला असेल अशा ठिकाणी जेव्हा कामगारांना काम करावे लागल किंवा अशा मालाची हाताळणी करावी लागेल अथवा त्याच्या आसपास काम करावे लागेल तेव्हा कोणती खबरदारी घ्यावयाची हे विहित करणारे ;

(थ) दुखापत झालेल्या कामगारांवर प्रथमोपचार करणे आणि उपचारासाठी त्यांना जवळच्या ठिकाणी हलवणे यांबाबत उपबंध करणारे ;

(द) पाण्याखाली काम करणाऱ्या कामगारांचा बुडण्यापासून बचाव करण्याबाबत उपबंध विहित करणारे ;

(ध) कलम ८ खाली आवश्यक असलेले, या अधिनियमाचे व त्याखाली केलेल्या विनियमांचे गोषवारे विहित करणारे ;

(न्) अपघात आणि धोकादायक घटना यांच्या नोटिसा सादर करण्याबाबत उपबंध करणारे, तसेच अशा नोटिशींचे नमुने, त्या ज्यांच्याकडे पाठवावयाच्या त्या व्यक्ती व प्राधिकरणे, त्यांत अंतर्भूत करावयाचा मजकूर व त्या किती मुदतीत सादर करावयाच्या ते विहित करणारे ;

(प्) या अधिनियमाखाली करण्यात येणाऱ्या विनियमांच्या अनुपालनासाठी कोणत्या व्यक्ती आणि प्राधिकरणे जबाबदार असतील ते विनिर्दिष्ट करणारे ;

(फ्) या कलमाखाली करण्यात आलेल्या विनियमांपैकी कोणत्याही विनियमांपासून कोणत्या परिस्थितीत आणि कोणत्या शर्तींच्या अधीनतेने सूट देता येईल ते निश्चित करणारे, अशी सूट कोणती प्राधिकरणे देऊ शकतील हे विनिर्दिष्ट करणारे, आणि त्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती विनियमित करणारे ;

(ब्) कलम ४ च्या खंड (ग्) खाली निरीक्षक ज्यांचा वापर करतील अशा अतिरिक्त शक्ती निश्चित करणारे ; आणि

(भ्) सर्वसाधारणपणे कामगारांच्या सुरक्षिततेबाबत उपबंध करणारे.

(२) या कलमाखाली केलेल्या विनियमांद्वारे, एखाद्या विशिष्ट बंदराच्या किंवा बंदरांच्या विशेष गरजा भागवण्यासाठी विशेष उपबंध करता येतील.

(३) या कलमाखाली विनियम करताना, त्या विनियमाचा भंग हा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, आणि असा भंग सतत चालू राहणारा भंग असेल तर पहिल्या दिवसानंतर ज्या ज्या दिवशी भंग चालू राहील त्या प्रत्येक दिवसाला वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या आणखी द्रव्यदंडास पात्र होईल असा निदेश केंद्र शासन देऊ शकेल.

**स्थानिक शासनाची नियम करण्याची शक्ती.**

६. [1] * * * * [2][ केंद्र शासनास ]—

(क्) जेथे प्रक्रिया चालवल्या जातात ती वास्तू आणि जहाजे यांची पाहणी; आणि

(ख्) निरीक्षकांनी, या अधिनियमाखाली त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर कशा रीतीने करावयाचा ते,

विनियमित करणारे नियम करता येतील.

**विनियम आणि नियम यांच्याशी संबंधित असलेले सर्वसाधारण उपबंध.**

७. (१) विनियम आणि नियम करण्याबाबत कलम ५ आणि ६ खाली प्रदान करण्यात आलेली शक्ती ते विनियम आणि नियम पूर्वप्रकाशनानंतर करावयाचे या शर्तीस अधीन आहे.

(२) विनियम आणि नियम [3][ **शासकीय राजपत्रात** ] प्रकाशित केले जातील.

**अधिनियम आणि विनियम ठळक ठिकाणी लावणे.**

८. जेथे प्रक्रिया चालवल्या जातात असे प्रत्येक बंदर, मालधक्का, मालकट्टा किंवा तत्सम वास्तू यांच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळच्या एखाद्या ठळक जागी इंग्रजीत आणि बहुसंख्य कामगारांची जी भाषा असेल त्या भाषेत, या अधिनियमातील आणि त्याखाली करण्यात आलेल्या विनियमातील जे गोषवारे त्या विनियमांद्वारे विहित करण्यात येतील ते लावले जातील.

**दंड.**

९. जी कोणतीही व्यक्ती—

(क्) एखाद्या निरीक्षकाला, तो कलम ४ खालील कोणत्याही शक्तींचा वापर करीत असताना बुद्धिपुरस्सर अटकाव करील किंवा या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या विनियमांना अनुसरून ठेवण्यात आलेल्या कोणत्याही नोंदवह्या किंवा अन्य दस्तऐवज किंवा प्रक्रियांसाठी वापरण्यात येणारा कोणताही सरंजाम—मग तो कायम बसवलेला असो वा सुटा असो—यांची निरीक्षकाने मागणी केली असता ती हजर करण्यास चुकेल किंवा एखाद्या व्यक्तीला निरीक्षकापुढे हजर होता येऊ नये किंवा निरीक्षका-कडून तिची तपासणी होऊ नये म्हणून तिच्या बाबत गुप्तता राखील किंवा तिला प्रतिबंध करील किंवा प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करील, किंवा

(ख्) या अधिनियमाखाली केलेल्या विनियमाद्वारे किंवा त्याखाली ज्याची तरतूद करावी लागते असे कोणतेही कुंपण, मार्गिका, सरंजाम, शिडी, प्राणरक्षक साधन किंवा उपयंत्र, दिवा, चिन्ह, माचण किंवा अन्य एखादी वस्तू रीतसर प्राधिकार नसताना किंवा तसे करणे अपरिहार्य नसताना काढून टाकील, किंवा

(ग्) अपरिहार्य प्रसंगी एखादे कुंपण, मार्गिका, सरंजाम, शिडी, प्राणरक्षक साधन किंवा उपयंत्र, दिवा, चिन्ह, माचण किंवा अन्य एखादी वस्तू काढून टाकल्यानंतर जेवढ्या कालावधीसाठी असे काढून टाकणे अपरिहार्य होते तेवढा कालावधी संपल्यानंतर ती पूर्ववत ठेवणार नाही,

ती पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

---

[1] "गव्हर्नर-जनरल-इन-कौन्सिल यांच्या नियंत्रणाच्या अधीनतेने" हे शब्द भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७ द्वारे वगळण्यात आले.

[2] कित्ता–द्वारे "स्थानिक शासन" याच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घालण्यात आला.

[3] भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७ द्वारे "अनुक्रमे **भारत सरकार राजपत्र** आणि **स्थानिक अधिकृत राजपत्र** यांमध्ये" ह्या शब्दांऐवजी घालण्यात आले.

अधिकारितेसंबंधी उपबंध.

१०. (१) इलाखा शहर दंडाधिकाऱ्याच्या किंवा प्रथमवर्ग दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाहून कनिष्ठ दर्जाचे न्यायालय हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले विनियम यांखालील कोणत्याही गुन्ह्याची संपरीक्षा करणार नाही.

(२) हा अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले विनियम यांखालील कोणत्याही गुन्ह्याबाबत कोणताही अभियोग मांडता येणार नाही.

(३) हा अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले विनियम यांखालील कोणत्याही गुन्ह्याबाबतची तक्रार, गुन्हा ज्या दिनांकास घडल्याचे अभिकथित करण्यात आले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत करण्यात आली नाही तर कोणतेही न्यायालय तिची दखल घेणार नाही.

सूट देण्याची शक्ती.

११. (क) जेथे फक्त काही प्रसंगीच प्रक्रिया चालवल्या जातात किंवा जेथे वाहतूक थोड्या प्रमाणावर आणि लहान जहाजांपुरतीच मर्यादित असते असे कोणतेही बंदर किंवा ठिकाण, गोदी, मालधक्का, मालकट्टा, किंवा तत्सम वास्तू, किंवा

(ख) एखादे विनिर्दिष्ट जहाज किंवा जहाजवर्ग,

यांना केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्यास योग्य वाटतील अशा काही शर्ती असल्यास त्या शर्तींवर, हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले विनियम यांच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही उपबंधांतून सूट देऊ शकेल.

या अधिनियमाखाली कृती करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण.

१२. या अधिनियमाखाली जी कोणतीही गोष्ट सद्भावपूर्वक करण्यात आली असेल किंवा ती करण्याचे सद्भावपूर्वक योजलेले असेल अशा कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, अभियोग किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

# INDIAN DOCK LABOURERS ACT, 1934

## भारतीय गोदी कामगार अधिनियम, १९३४

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| beams | तुळया | [S.5 (1) (g)] |
| bulk cargo | भरताडी माल | [S.5 (1) (n)] |
| cargo | जहाजी माल | [S.2 (a)] |
| cargo falls | पडणारा जहाजी माल | [S.5 (1) (l)] |
| charges | कार्यभाराची क्षेत्रे | [S.3 (2)] |
| convention | अभिसंधी | [Long title] |
| cranes | याऱ्या | [S.5 (1) (j)] |
| deck | जहाजाचा मजला | [S.5 (1) (d)] |
| derricks | गदम | [S.5 (1) (j)] |
| dock | गोदी | [S.5 (1) (a)] |
| exhaust and live steam | निष्कासित व सचेतन वाफ | [S.5 (1) (k)] |
| fencing | कुंपण बांधणे | [S.5 (1) (a)] |
| gangway | मार्गिका | [S.9 (b)] |
| gear | सरंजाम | [S.4 (b)] |
| give signal | संकेत दर्शवणे | [S.5 (1) (l)] |
| handling | हाताळणी करणे | [S.5 (1) (m)] |
| hatch coverings | फाळका आच्छादने | [S.5 (1) (g)] |
| hatchways | फाळके | [S.5 (1) (e)] |
| hoisting machine | उच्चलन यंत्र | [S.5 (1) (h)] |
| hold | कोठी | [S.5 (1) (d)] |
| hulk | गलबताचा सांगाडा | [S.5 (1) (b)] |
| immersed workers | पाण्याखाली काम करणारे कामगार | [S.5 (1) (r)] |
| in case of necessity | अपरिहार्य प्रसंगी | [S.9 (c)] |
| ladder | शिडी | [S.9 (b)] |
| light | दिवा | [S.9 (b)] |
| lighting | प्रकाशयोजना | [S.5 (1) (a)] |
| live electric conductors | सचेतन विद्युतवाही | [S.5 (1) (i)] |
| live steam pipes | सचेतन बाष्प नळ | [S.5 (1) (i)] |
| loading | माल चढवणे | [Long title] |
| mark | चिन्ह | [S.9 (b)] |
| Mercantile Marine Department | वाणिज्य नौधन विभाग | [S.3 (2)] |
| noxious | अपायकारक | [S.5 (1) (m)] |
| on board | बोडदावर | [S.5 (1) (f)] |
| on board the ship | जहाजाच्या बोडदावर | [S.2 (a)] |
| openings | उघडण्या | [S.5 (1)(e)] |
| premises | वास्तू | [S.4 (a)] |
| quay | मालकट्टा | [S.5] |
| regular approaches | नित्याचे पोचमार्ग | [S.5 (1) (a)] |
| stage | माचण | [S.5 (1) (o)] |
| signaller | संकेतक | [S.5 (1) (l)] |
| stacking | रास रचणे | [S.5 (1) (m)] |
| stowing and unstowing (of cargo) | (माल) ठासून भरणे व त्यातून काढणे | [S.5 (1) (m)] |
| safety appliances | सुरक्षा उपकरणे | [S.5 (1) (j)] |
| the processes | प्रक्रिया | [S.2 (a)] |
| traffic | वाहतूक | [S.11 (a)] |
| trucks | लाडीस | [S.5 (1) (o)] |
| unloading | माल उतरवणे | [Long title] |
| unstacking | राशीतून माल काढणे | [S.5 (1) (m)] |
| vessel | जलयान | [S.5 (1) (s)] |
| wharf | मालधक्का | [S.5 (1) (a)] |
| winches | कर्षी | [S.5 (1) (j)] |
| winch end | कर्षीचे टोक | [S.5 (1) (b)] |
| winch drums | कर्षी रंभ | [S.5 (1) (l)] |
| worker | कामगार | [S.2 (b)] |

# भारतीय गोदी कामगार अधिनियम, १९३४

# INDIAN DOCK LABOURERS ACT, 1934

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अपरिहार्य प्रसंगी | in case of necessity | [S.9 (c)] |
| अपायकारक | noxious | [S.5 (1) (m)] |
| अभिसंधि | convention | [Long title] |
| उच्चलन यंत्र | hoisting machine | [S.5 (1) (h)] |
| उघडण्या | openings | [S.5 (1) (e)] |
| कर्षी | winches | [S.5 (1) (j)] |
| कर्षीचे टोक | winch end | [S.5 (1) (l)] |
| कर्षी रंभ | winch drums | [S.5 (1) (l)] |
| कामगार | worker | [S.2 (b)] |
| कार्यभाराची क्षेत्रे | charges | [S.3 (2)] |
| कुंपण बांधणे | fencing | [S.5 (1) (a)] |
| कोठी | hold | [S.5 (1) (d)] |
| गदम | derricks | [S.5 (1) (j)] |
| गलबताचा सांगाडा | hulk | [S.5 (1) (b)] |
| गोदी | dock | [S.5 (1) (a)] |
| चिन्ह | mark | [S. 9 (b)] |
| जलयान | vessel | [S.5 (1)(b)] |
| जहाजाचा मजला | deck | [S.5 (1) (d)] |
| जहाजाच्या बोडदावर | on board the ship | [S.2 (a)] |
| जहाजी माल | cargo | [S.2 (a)] |
| (माल) ठासून भरणे व त्यातून काढणे | stowing and unstowing | [S.5 (1) (m)] |
| तुळया | beams | [S.5 (1) (g)] |
| दिवा | light | [S. 9 (b)] |
| नित्याचे पोचमार्ग | regular approaches | [S.5 (1) (a)] |
| निष्कासित व सचेतन वाफ | exhaust and live steam | [S.5 (1)(k)] |
| पडणारा जहाजी माल | cargo falls | [S.5 (1)(l)] |
| पाण्याखाली काम करणारे कामगार | immersed workers | [S.5 (1) (r)] |
| प्रकाशयोजना | lighting | [S.5 (1)(a)] |
| प्रक्रिया | the processes | [S.2 (a)] |
| फाळका आच्छादने | hatch coverings | [S.5 (1) g)] |
| फाळके | hatchways | [S.5 (1) (e)] |
| बोडदावर | on board | [S.5 (1) (f)] |
| भरताडी माल | bulk cargo | [S.5 (1) (n)] |
| माचण | stages | [S.5 (1) (o)] |
| मार्गिका | gangway | [S.9 (b)] |
| माल उतरवणे | unloading | [Long title] |
| मालकट्टा | quay | [S.5 (1) (a)] |
| माल चढवणे | loading | [Long title] |
| मालधक्का | wharf | [S.5 (1) (a)] |
| याऱ्या | cranes | [S.5 (1) (j)] |
| राशीतून माल काढणे | unstacking | [S.5 (1) (m)] |
| रास रचण | stacking | [S.5 (1) (m)] |
| लाडीस | trucks | [S.5 (1) (o)] |
| वाणिज्य नौधन विभाग | Mercantile Marine Department | [S.3 (2)] |
| वास्तू | premises | [S.4 (a)] |
| वाहतूक | traffic | [S.11 (a)] |
| शिडी | ladder | [S.9 (b)] |
| संकेतक | signaller | [S.5 (1) (l)] |
| संकेत दर्शवणे | give signal | [S.5 (1) (l)] |
| सचेतन बाष्प नळ | live steam pipes | [S.5 (1) (i)] |
| सचेतन विद्युतवाही | live electric conductors | [S.5 (1) (i)] |
| सरंजाम | gear | [S.4 (b)] |
| सुरक्षा उपकरणे | safety appliances | [S.5 (1) (j)] |
| हाताळणी करणे | handling | [S.5 (1) (m)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई